REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 10 | JULY - 2018

# अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील लोकशाही मूल्ये

**प्रा. डॉ. श्रीरंग शामराव लोखंडे**
**यशवंतराव चव्हाण महाविद्यालय तुळजापूर, जि- उस्मानाबाद.**

**प्रस्तावनाः-**

समाजात सामाजिक समता, स्वातंत्र्य आणि सामाजिक न्याय पाळणायांची संख्या जितकी जास्त असेल, तितकी जास्त असेल तितकी त्या समाजाची प्रगती अधिक होत राहते. समाजनिष्ठा समाजशिस्त, सामाजिक न्याय, इतर व्यक्तीबद्दल आदरभाव, सामाजिक बांधिलकी हे महत्वपूर्ण घटक आहेत. समाजातील प्रत्येक मनुष्याने गरीब-श्रीमंत, स्पृश्य-अपृश्य, लिंग, धर्म, जात, पंथयाच्या आधारावर कोणत्याही व्यक्तीमध्ये भेदभाव, पक्षपात करु नये. अशा प्रकारची भावना प्रत्येक मनुष्याचे जीवन जगत असतांना, आचरणात आणणे गरजेचे आहे. तरच समाजाचा सर्वांगीण विकास होत असतो. समाजाचा विकास होण्यासाठी समाजातील प्रत्येक व्यक्तीने या सामाजिक भावनेचा अंगिकार करणे गरजेचे असल्याचे मत अण्णाभाऊ साठे यांनी व्यक्त केले आहे.

समाजातील विषमता नष्ट करणे हे त्यांच्या साहित्य लेखनाचे ध्येय आहे. समाज परिवर्तन घडवून आणण्यासाठी आवश्यक असणाऱ्या, विद्रोही जाणीवा त्यांच्या साहित्यातून स्पष्ट करण्यात आल्या. अर्थात सामाजिक परिवर्तन ही त्यांच्या साहित्यलेखनामागची मुख्य प्रेरणा आहे. बालपणापासूनच अण्णाभाऊ साठे यांना दारिद्र्याचे आणि सामाजिक विषमतेचे चटके सहन करावे लागले. बालपणातील दाहक अनुभवामुळे त्यांचे मन बंडखोर बनत गेले. याची अनेक उदाहरणे त्यांच्या चरित्र ग्रंथात आढळतातत. जीवनावर, माणूसपणावर प्रचंड निष्ठा, विश्वास असल्याने अण्णाभाऊ साठे संघर्ष करण्यासाठी सदैव तयार असत. बालपणापासून माणूस आणि त्या माणसाचे जगणे हा त्यांच्या चिंतनाचा विषय होत आला आहे. यामुळेच माणूस हा त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू बनत गेला. माणसाकडून माणसाचे होणारे शोषण थांबविल्याशिवाय आर्थिक, सामाजिक समता प्रस्थापित होऊ शकत नाही, याची जाणीव अण्णाभाऊ साठे यांना होती. म्हणूनच त्यांनी विषमतेवर घाव घातला. मार्क्सवाद हा त्यांच्या अत्यंत जवळचा विषय त्यांनी बनविला. भारतातील आर्थिक विषमता सामाजिक विषमतेवर आधारित असल्याने त्यांनी आंबेडकरवादही प्रेरक असल्याचे मानलले आहेत.

आपण जे जीवन जगतो, तेच जीवन जगणाऱ्या बहुजन जनतेच्या मनातील उदात्त स्वप्ने, विचार शब्दबध्द करावेत या मोहाने ग्रंथाना पुढे आणावे यासाठी प्रयत्न करावेत. अण्णांना दलित जीवनात पिचणाऱ्या माणसांचाच विचार बैचेन करु लागला होता. पोवाड्याला चिंतनाची ठाम अशा स्वरुपाची विशेष बैठक होती. त्यांच्या ज्वलंत आणि जातीवंत प्रतिभेत सहज डोळ्यात भरावा असा मर्दानीपणा होता आणि त्या मर्दानीपणाला अण्णाभाऊंनी कारुण्याची सुंदरशी रम्य किनार जोडली होती. गुलामगिरीबद्दल वाटणारा द्वेष त्यांनी पोवाड्यातून परखडपणे प्रकट केले आहेत. आपल्या अंतरंगात/आत्म्यास सामाजिक अन्यायाविरुध्द विषमतेविरुध्द, विसंगतीबद्दल निर्माण झालेली आग ते ज्वालाग्राही शब्दाने व्यक्त केलेले आहेत म्हणूनच ते सामाजिक लेखक आहेत. असे मला प्रामाणिकपणे वाटते.

धगधगणारे जीवन जगणाऱ्या माणसांचे, विश्वच रेखाटण्यात अण्णाभाऊंनी धन्यता का मानावी ? तर याचे उत्तर एकच देता येईल की अण्णाभाऊंच्या मनाचा व त्या जीवनाची जातकुळीच मुळी एक होती. उपेक्षितांचे अंतरंग उलगडून दाखविण्याचा प्रयत्न वेगळ्या वळणाचा होता. सगाजी, रामभरोसे, राही, सत्या रामवंशी, शेवंती, देवकाई इत्यादी पददलित म्हणून किंवा उपेक्षित म्हणून मानल्या गेलेल्या माणसांची कैफियत अत्यंत पोडतिडकीने मांडली. माणूसच माणसाचा घात कसा करतो ? या विषमतेतून भारतीय समाजव्यवस्थेला बाहेर काढण्यासाठी मानवीमूल्ये, सामाजिकमूल्ये व लोकशाहीमूल्यांची जाणीव करुन देण्यासाठी अण्णाभाऊंनी साहित्यकृतीची निर्मीती केलेली आहे हे आपल्याला नाकरता येत नाही.

दलितांच्या जीवनाचं वास्तव चित्रण, प्रामाणिक हेतूने आणि अनेक कथा कादंबऱ्यातून अण्णाभाऊंनी केलं आहे. दलित म्हणत असताना एका विशिष्ट जाती जमातीविषयीची अस्मिता त्यांनी प्रकट केली नाही. जे जे अन्यायाखाली भरडले जातात, दारिद्र्याने, दैन्याने, दूरवस्थेने हैराण होतात. परिस्थितीने पिचले जातात. उपेक्षेचे, अपमानाचे अगतिक जीवन जगत असतात. ते सर्वजन अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यातन व्यक्त केल्याचे दिसून येते.

अस्पृश्यांच्या जीवनात मरणप्राय यातना होत्या. जन्माने आम्ही अस्पृश्य नाही तर हे अस्पृश्यांचे भयानक भूत येथेच हेतूपुरस्पर निर्माण केले गेले, त्यावर आघात करुन ते उध्दवस्त करण्याचा निर्धार अण्णांनी केले, म्हणून अण्णांना महात्मा फुले, शाहु महाराज, संत गाडगेबाबा, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे वारसदार म्हटले तर वावगे ठरणार नाही. कारण अण्णांचे मूळ ध्येय मानवतावादी हे होते. समाजात

उघड्या डोळ्यांनी वावरले व समाजाची योग्य नाडी तपासून अशक्त रोगीट समाजाला योग्य दिशा उपचार करण्यासाठी संपूर्ण हयात घालविली. समाजातील विषमता, सावकारशाही, काळाबाजार, दारिद्र्य व अज्ञान या सर्व विषारी विळख्यात अडकलेला हरिजन, बहुजन समाज की ज्यांच्या नशिबी आलेले दु:ख, यातना, अपमान, गुलामगिरी या सर्व अनुभूतीची अभिव्यक्ती अण्णाभाऊंनी साहित्यातून व्यक्त केलेले आहेत म्हणून ते मानवतावादाचे उपासक आहेत असे वाटते.

**अण्णाभाऊ साठेंच्या साहित्यात स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुत्व ही संविधानीक मुल्ये पहाण्यास मिळतात का ?**

| अ.क्र. | | होय | नाही | अंशत: | सांगता येत नाही |
|---|---|---|---|---|---|
| १ | सामान्य नागरीक | ८२% | ००% | ०२% | १६% |
| २ | लेखक अभ्यासक | १००% | ००% | ००% | ००% |
| ३ | वक्ते | १००% | ००% | ००% | ००% |

'शाहिरी' या कलेतून सारा महाराष्ट्र जागविला. ज्यांना अस्पृश्य म्हणून गुराढोरांचे जीवन जगावे लागले, त्याच घरी जन्माला आलेल्या शाहिराने संयुक्त महाराष्ट्राची चळवळ यशस्वी करुन दिली. प्राचीन काळी देवालयातून वेदांचे पठण केले जात होते, ते पठण जर चुकून एखाद्या अस्पृश्याने ऐकले तर त्याच्या कानात गरम तेल टाकले जात असे. कुणी म्हटले तर त्याची जीभ कापली जात होती. अशी क्रुर विषमता विषमता त्या काळात होती. ही बीभस्त विषमता कित्येक शतकांपासून चालू होती. या असंख्य विषमतावादी परंपरांवर, पिळवणूकीवर अण्णांनी प्रहार केलेले आहेत. अस्पृश्यांनी शाहिरीचा अनमोल जपून ठेवला. हीच शाहिरी अण्णाभाऊंनी जनप्रबोधनाचे शस्त्र म्हणून वापरली व यशस्वीपणे त्या शस्त्राची ताकद, प्रभाव समाजात निर्माण केलेले आहेत. कोणतीच कला, मानव हा हीन जातीचा, कमी नाही. सर्व माणसे सारखी आहेत. समता प्रस्थापित करण्यासाठी अण्णांनी अहोरात्र प्रयत्न केले. म्हणून ते सामाजिक परिवर्तनाचे वैचारिक प्रबोधनकार आणि शाहीर आहेत असे मला प्रामाणिकपणे वाटते.

दारिद्र्यासोबत रडत बसणे अण्णांना आवडत नव्हते, तर बाबासाहेबांनी सांगितलेली त्रिसूत्री 'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा', त्याशिवाय दारिद्र्यातून बाहेर निघणे अवघड आहे. जोपर्यंत आपण अज्ञानापासून अंधश्रध्देपासून, गुलामगिरीतून बाहेर पडत नाही तो पर्यंत आपली प्रगती नाही. जीवनामध्ये नवी पहाट, प्रकाशदीप लावण्यासाठी शिक्षणच घेतले पाहिजे. अण्णाभाऊ साठे यांनी केवळ दीड दिवसाची शाळा शिकून आत्मनुभवाच्या विद्यापीठातून आत्मजाणीवाची शिदोरी घेवून आणि शब्दरत्नांची झालर त्यांनी आपल्या साहित्याला गोफलेली आहे म्हणुन ते साहित्यसम्राट, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे असा गौरव झालेला आहे हे आपल्याला नाकरता येत नाही. अण्णा स्वत: खूप वर्ग शिकले नव्हते, त्याची त्यांना नेहमी खंत वाटत होती. पण इतर आपल्या बांधवांनी व भगिनीनी खूप शिकावे ही तळमळ त्यांच्या मनात होती.

## सारांश व निष्कर्ष :-

अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील लोकशाही मूल्यांचा आढावा घेण्यात आलेला आहे. त्यानुसार अण्णाभाऊ साठेंना स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुत्व ही लोकशाही मूल्य अभिप्रेत होती असे दिसून येते भारतीय संविधानाची चतु:सूत्री असलेल्या या लोकशाही मूल्यांचा पुरस्कार पावलोपावली अण्णाभाऊ साठेंनी केलेला पहावयास मिळतो अण्णाभाऊ साठे हे समाजाच्या परिवर्तनासाठी आणि सामाजिक व्यवस्थेविरुध्द बंड करुन उठलेले नायक म्हणून पाहावयास मिळतात. अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्य मध्ये जे नायक उभे केलेले आहेत त्यांच्यावर इथल्या सामाजिकव्यवस्थेने, सत्तेने अन्याय अत्याचार केलेले पहावयास मिळतात त्यांनी अत्याचार झुगारुन त्यांच्याविरुध्द बंड करुन स्वातंत्र्यासाठी लढा देणारे नायक-नायिका अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातून पाहायला मिळतात अण्णाभाऊ साठेंनी या समाजव्यवस्थेतील कमालीची विषमता आणि त्याविषयीचे दाहक चित्रण आपल्या साहित्यातून कार्यातून कलाकृतीतून आणि लढ्यातून मांडलेले असल्याचे पहावयास मिळते. या विषमतेविरुध्द लढा देऊन समता प्रस्थापित करण्यासाठी अण्णाभाऊ साठे प्रयत्न करताना दिसून येतात. त्यांच्या साहित्यातील अनेक व्यक्तिरेखा या आयुष्यभर झुंज देताना दिसून येतात. त्याचप्रमाणे अण्णाभाऊ साठेंनी प्रत्यक्ष जीवनामध्ये कामगार वर्गासाठी जे लढे दिले, मजूर, शोषित, श्रमिक, दलित, पीडित यांच्यासाठी दिलेल्या लढ्यामध्ये भांडवलदार, गिरणी मालक यांच्याकडून होणाऱ्या शोषणाविरुध्द दिलेल्या लढ्यांमध्ये कमालीची चीड पाहायला मिळते. एकंदरीतच समाजामध्ये प्रस्थापीत व्यवस्थेने जातीच्या उतरंडी नुसार जी वर्गवारी केलेली आहे. ही समाजव्यवस्था मुळातच विषमतेवर आधारीत आहे असे अण्णाभाऊ साठे नमूद करतात, आणि ही समस्त समाज व्यवस्था बदलून टाकून आम्हाला माणूस म्हणून असलेले अधिकार हक्क आणि न्याय अपेक्षित आहे. तो या समाजव्यवस्थेने भल्या बोला ने दिला तर ठिक अथवा तो हिरावून घेण्याची क्षमता आमच्यात आहे आणि त्यासाठी लढा उभारण्याची जिद्द अण्णाभाऊ साठेंनी केलेली आहे. यामधून अण्णाभाऊ साठेंना ही विषमता दूर करुन त्याठिकाणी समता प्रस्थापित करणे अपेक्षित होते असे दिसून येते. त्यानंतर अण्णाभाऊ साठे यांनी आयुष्यभर अन्यायाविरुध्द झुंज दिलेली आहे. समाजव्यवस्थेमध्ये अन्याय झालेल्या लोकांची पात्रे अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून विशद केलेली आहेतच परंतू मुंबईच्या गिरणी कामगार, शोषित, कष्टकरी, दलित, स्त्रिया अनेक

वर्गावर होणारे अन्याय अत्याचार अण्णाभाऊ साठेंनी आपल्या साहित्यातून अधोरेखित करुन त्यांच्याविरुध्द लढा उभारला आहे. प्रेरणा निर्माण केलेली आहे, आणि न्याय मागण्यासाठी अविरत संघर्ष केलेला पहावयास मिळतो.

**संदर्भ सुचीः-**


१. डॉ.गुरव बाबुराव, "अण्णाभाऊ साठे समाज विचार आणि साहित्य विवेचन" लोक वाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, १९९९ पृ.क्र. १९९
२. कठाळे नानासाहेब, "अण्णाभाऊ साठे : जीवन आणि साहित्य, अण्णाभाऊ साठे साहित्य प्रकाशन मंच, नागपुर, २००१, पृ.क्र. ९
३. अण्णाभाऊ साठे, 'फकिरा', "लोकसाहित्यिक अण्णाभाऊ साठे- समग्र वाङ्मय", प्रतिमा पब्लिकेशन्स, पुणे, २०१२ पृ.क्र. १९७
४. डॉ.गुंदेकर श्रीराम, 'शाहिर अण्णाभाऊ साठे', संपादक-नागोराव कुंभार, प्रबोधन प्रकाशन, लातूर-१९९३ पृ.क्र.६७
५. कठाळे नानासाहेब, पुर्वोक्त-६, पृ.क्र. १२०